भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०११-१२/२५१
डीबीओडी.एएमएल बीसी.क्र.४७/१४.०१.००१/२०११-१२ नोव्हेंबर ४, २०११

अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व अनुसूचित वाणिज्य बँका (आरआरबी सोडून)/स्थानिक क्षेत्रीय बँका.

महोदय,

**चेक्स/ड्राफ्ट्स/पेऑर्डर्स/बँकर्स चेक्स देणे**

प्रदानासाठी सादर केलेल/चेक्स/ड्राफ्ट्स/बँकर्स चेक्स ह्यांचे प्रदान त्या संलेखाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालासच करण्याची, ह्या देशातील बँकर्सची रीत आहे.

२. भारत सरकारकडून रिझर्व बँकेच्या नजरेस आणले गेले की, अशा चेक्स/ड्राफ्ट्स/पे ऑर्डर्स/बँकर्स चेक्सचे प्रदान, त्या संलेखाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या काळात करण्याच्या बँकांच्या पध्दतींचा, काही लोक, ते संलेख बाजारात सहा महिनेपर्यंत फिरवत ठेवून, गैरफायदा घेत आहेत. जनतेच्या हिताच्या दृष्टीने व बँकिंग धोरणाच्या हितसंबंधांसाठी असे करणे आवश्यक असल्यासबाबत रिझर्व बँकेचे समाधान झाल्याने, प्रदानासाठी सादर केलेल्या चेक्स/ड्राफ्ट्स/पेऑर्डर्स/बँकर्स चेक्स वटविण्याच्या कालावधी सहा महिन्यां ऐवजी तीन महिने करणे आवश्यक आहे त्यानुसार, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९, च्या कलम ३५ अ ने दिलेल्या अधिकारांचा वापर करुन भारतीय रिझर्व बँका निदेश देत आहे की, एप्रिल १, २०१२ पासून, चेक्स/ड्राफ्ट्स/पे ऑर्डर्स/बँकर्स चेक्सच्या तारखेपासून तीन महिन्यांनंतर सादर केलेल्या अशा संलेखांचे प्रदान बँकांनी करु नये.

३. बँकांनी ह्या सूचनांचे कडक पालन करावे आणि असे संलेख धारण करणारांना, १ एप्रिल २०१२ किंवा त्यानंतर दिलेली चेकबुकांची पाने, ड्राफ्ट, पे ऑड्र्र्स व बँकर्स चेकची पाने ह्यावर छापून किंवा शिक्का मारुन, अशे संलेख सादर केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या वटविण्याच्या कालावधीबाबत सूचना दिल्या जाव्यात.

४. कृपया पोच द्यावी.

आपला,

(दीपक सिंघल)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

बँकिंग व्यवहार आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालय, सी.ओ बिल्डिंग १३वा मजला, फोर्ट, मुंबई,४०००01
टेलिफोन क्र:०२२-२२६०१००० फॅक्स क्र०२२-२२७०१२३९ ईमेल आयडी: cgmicdbodco@rbi.org.in